## भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(दुपार)

जा.क्र. ३६/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक १५/०१/२०१७

**१) गोडाऊनचा ताला तोडुन डि. जे. साहीत्यांची चोरी . :—**

दिनांक १२/०१/२०१७ चे २३.०० वा. दर. यातील फिर्यादी निलेश रुषी रंगारी वय २७ वर्ष, रा. माडगी यांचे गोडाऊन मध्ये ठेवलेले डि. जे. साहीत्य ऑडीओ सेंटर प्रो ९ प्रोटॉन एमटी १२०१, फोनीक २००० व्हॅट, अहुजा ५०० व्हॅट मशिन, असा एकुण ६७,०००/—रु. चा माल कोणीतरी अज्ञात चोराने कुणीही नसल्याची संधी साधुन गोडाऊनचे शटर्सचा ताला तोडुन आत प्रवेश करुन चोरुन नेल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम ४६१,३८० भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. माहुर्ले पोलीस स्टेशन तुमसर हे करीत आहेत.

**२) दारूडया वाहन चालकावर कारवाई . :—**

दिनांक १४/०१/२०१७ चे १७.०० ते १७.३० वा. दर. यातील आरोपी चालकाने आपल्या ताब्यातील मोटार सायकल क्र. ७६४२ चा चालक हा दारू पीवुन दारू चे नशेत सार्वजनीक ठिकाणी आमरोडवर चालवीतांना मिळुन आल्याने त्याला ताब्यात घेवुन ग्रा. रु. पवनी येथे वैद्यकीय तपासनी केली असता डॉ. ने दारु पिल्याबाबदचा अभिप्राय दिल्याने सरतर्फे फिर्यादी पोहवा. कोडवते यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन पवनी येथे कलम १८५ मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. कोडवते पोलीस स्टेशन पवनी हे करीत आहेत.

**३) महीलेचा जळाल्याने उपचारा दरम्यान मृत्यु :—**

दिंनाक १६/१२/२०१६ चे १८.०० वा. दर. यातील मृतक सौ. नलु रामभाऊ हेमने वय २८ वर्ष, रा. भावड ही भावड येथे स्वत:चे घरी दि. १६/१२/२०१६ ला १८.०० वा. दर. सिंलेडर सुरु करुन गॅस पेटवुन स्वयंपाक करित असतांना तिचा पदर शेगडी वर पडुन साडीच्या पदराला आग लागुन ९० टक्के जळाल्याने तिला औषधोपचाराकरीता मेडीकल कॉलेज नागपुर येथेभरती केले असता उपचारादरम्यान दि. ०७/०१/२०१७ चे २१४१ वा दर. मरण पावल्याने पो.स्टे. अजनी नागपुर येथे मर्ग क्र. ००/१७ कलम १७४ जाफौ. चे कागदपत्र पोस्टे अडयाळ येथे प्राप्त झाल्याने सरतर्फे फिर्यादी पोहवा. कठाणे पोस्टे अडयाळ येथे कलम १७४ जाफौ. अन्वये नंबरी मर्ग नोंद केला. पुढील तपास पोहवा. जाधव पो. स्टे. अडयाळ हे करीत आहे.

**४) मोटार वाहन कायद्याखाली कारवाई. :—**

दिनांक १४/०१/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायद्याखाली ७२ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून त्यापैकी, अवैध प्रवासी वाहनावरती ०१ तिन सिटर वाहनांवरती १८ केसेस व तसेच ईतर वाहनांवरती ५३ केसेस करण्यात आलेल्या आहे.

नियत्रंण कक्ष अधिकारी
भंडारा करीता
दुरध्वनी.क्र. ९४२३११५१८२

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.